प्रतिवादी क्रं. १ ते ५तर्फे सा.क्र.१
**(नि.क्र.४०७)**

**वादी तर्फे उलटतपास श्री. व्ही.एस.शेळके, वकील यांच्यामार्फत सुरु.**

**५१.** प्रतिवादी क्रं. ७ ते ९ यांची कैफीयत मला मान्य नाही. १९८८ सालापासून माझे वडील व माझे चुलते हे स्वतंत्र स्वयंपाक, देवघर करतात. फेरफार क्रं.१४७ मध्ये माझे वडील व चुलते यांनी ते १९७७ पासून स्वतंत्र आहेत असा उल्लेख आहे याबद्दल मला माहिती नाही. १९८४ साली अंतराम या माझ्या आजोबानी वादी व प्रतिवादी यांना त्यांच्या हिस्यातील मिळकती स्वतंत्र वाटून दिल्या असा फेरफार झाला याचे मला ज्ञान नाही. फेरफार क्रं.१४७, २७४ व ३५६ मध्ये वादजमीनींचा उल्लेख आहे यास माझे सांगणे मला फक्त ३५६ बद्दल माहिती आहे. फेरफार क्रं.३५६ मध्ये वादजमीनीचा उल्लेख आहे हे खरे आहे. मी फेरफार क्रं.१४७ ,२७४ व ३५६ हे कधीही बघितलेले नाहीत यास माझे सांगणे मी ३५६ बघीतलेला आहे. आता मला फेरफार क्रं. १४७ दाखविला त्यात वादजमीन आहे. मी सांगतो की सर्वे क्रं.५,८, ९/२,६/१,८/१/१,८/१/२,६/१,५/२,५/३,६९/१,६९/२ या जमीनीचा उल्लेख नाही. फेरफार क्रं. १४७ हा वाटणीचा आहे व त्यात ते विभक्त राहतात असा उल्लेख आहे हे म्हणणे बरोबर आहे. फेरफार क्रं.२७४ हा वाटणीचा आहे. मी सांगतो की त्यात सर्वे क्रं.९/२, ८/१, ८/२, ८/१/१, ६/१, ५/२, ५/१, ६९/१, ६९/२ यांचा उल्लेख नाही. आता मला फेरफार क्रं.३५६ दाखविला. हे खरे की, प्रभू उर्फ संभाजी यांनी वाटणीपत्र दाखल केल्यामुळे हा फेरफार तयार झाला. वाटणी फेरफार क्रं. ३५६ वर बालासाहेब व गंगाधर यांचा नावांचा उल्लेख फेरफार मंजूर करतानाचा नाही. हे खरे की, या फेरफारमध्ये प्रभू उर्फ संभाजी यांनी दाखल केलेले वाटणीपत्र या दाव्यात दाखल केलेले नाही. हे खरे की, बालासाहेब व गंगाधर यांनी फेरफार क्रं. ३५६ मंजूर होण्यासाठी संमती दिल्याबद्दलचे पत्र

महसूल खात्यात किंवा या दाव्यात दाखल नाही. संबंधिताना नोटीसा दिल्याबद्दल या फेरफारमध्ये जो उल्लेख आहे त्या नोटीसा महसूल खात्यात किंवा या प्रकरणात दाखल नाहीत याबद्दल मला माहिती नाही. सदर फेरफार हे वादींच्या अपरोक्ष झालेले आहेत हे म्हणणे खरे नाही. हे खरे नाही की, या फेरफारनुसार वादी व प्रतिवादीमध्ये कधीही वाटणी झालेली नाही. फेरफार क्रं. १४७ व २७४ हे फेरफार क्रं.३५६ ची नोंद घालताना रद्द झालेले नव्हते याबद्दल मला माहिती नाही. या तिन्ही फेरफार उता-यांमध्ये काय फरक आहे याबद्दल मला माहिती नाही. १९७७ ते १९८८ या काळात वादी व प्रतिवादी मध्ये भांडणतंटा व हाणामा-या घडलेल्या नाहीत याची मला माहिती नाही. माझ्या वडीलांनी २००६-२००७ साली माझ्या व माझ्या कुटुंबाच्या जमीनीवर कोणीही कर्ज काढू नये म्हणून बँकेकडे तक्रारअर्ज दिलेले होते. २००८ सालापूर्वी वादी व प्रतिवादीमध्ये कोणतेही वैरमानस्य नव्हते. हे खरे नाही की, माझे वडील व चुलते हे एकत्रित असल्याने फेरफार क्रं.१४७, २७४ व ३५६ हे नाममात्र होते.

**( न्यायालयीन कामकाजाची वेळ संपल्यामुळे उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब करण्यात येतो. )**

**श्रवणोत्तर स्विकृत**

समक्ष
स्वाक्षरीत/-
**( एस.एन.सरडे )**

दिनांक ०८/०८/२०२५. दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अहमदपूर.